लोकमत

# विद्यापीठाच्या परीक्षेसाठी २२ पर्यंत अर्ज भरता येणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारित तारखा जाहीर झाल्या आहेत. महाविद्यालय व अधिविभागातील विद्यार्थ्यांना विनाविलंब शुल्कासह २२ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरता येणार आहे. विद्यार्थ्यांना विनाविलंब शुल्कासह २२ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरता येणार आहे. विलंब शुल्कासह २३ सप्टेंबर ते २४ सप्टेंबरपर्यंत, तर अतिविलंब शुल्कासह २५ सप्टेंबरपर्यंत परीक्षा अर्ज भरता येणार आहे. महाविद्यालय व अधिविभागांनी विनाविलंब शुल्कासह २३ सप्टेंबर, विलंब शुल्कासह २५ सप्टेंबर आणि अतिविलंब शुल्कासह २९ सप्टेंबरपर्यंत विद्यापीठाकडे परीक्षा शुल्क भरावयाचे आहे, तर महाविद्यालय व अधिविभागांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जाच्या याद्या विद्यापीठाकडे विनाविलंब शुल्कासह २५ सप्टेंबर, तर विलंब व अतिविलंब शुल्कासह ३० सप्टेंबरपर्यंत सादर करावयाच्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
16 SEP 2025

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# भाषा मानवाला सुसंस्कृत बनवते : डॉ. शरणकुमार लिंबाळे

**कोल्हापूर, (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज):**

हिंदी विभाग व यूको बँकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हिंदी पखवाड्याचे उद्घाटन सरस्वती पुरस्कार प्राप्त लेखक शरणकुमार लिंबाळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी मानवी जीवनातील भाषेचे महत्व विषद केले. भाषा माणसाला सुसंस्कृत बनवते, अन्य पशुमात्रांपासून त्याला वेगळे करते. भाषेचे मानवी विकासामध्ये महत्वपूर्ण स्थान आहे. आपण भाषिक वादात न अडकता बहुभाषिक बनले पाहिजे. असे भाषेचे महत्व सांगतानाच लेखक न्यायासाठी लिहितो, समाजाला स्वस्थ, सुंदर बनवणे हे त्याचे ध्येय असते. दलित साहित्याने भारतीय साहित्याला विचार करण्यास व वास्तववादी साहित्य लिहिण्यास भाग पाडल्याचे मत त्यांनी मांडले. डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची पुस्तके इंग्रजी, हिंदी, गुजराती, तमिळ, कन्नड अशा अनेक भाषांत अनुवादित झाली आहेत. त्यामुळे त्यांचे साहित्य जागतिक पटलावर ठसा उमटवत आहे. पेग्वीन सारख्या जागतिक पातळीवरील



प्रकाशन संस्थेमार्फत त्यांचे साहित्य प्रकाशित केले जात आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी हिंदी भाषेचा वाढता आलेख स्पष्ट करत उपस्थितांना हिंदी दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले. डॉ. प्रकाश निकम यांनी आभार मानले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. गीता दोडमणी, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. संतोष कोळेकर, डॉ. सुषमा चौगले, प्रतीक्षा ठुंबरे तसेच संशोधक विद्यार्थी, एम. ए. हिंदी व भाषा प्रौद्योगिकी भाग १ व २ चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
1 6 SEP 2025




# कॉ.शरद पाटील यांनी भारतीय सामाजिक रचनेचे यथायोग्य आकलन करून घेण्यासाठी नवे प्रमाणशास्त्र विकसित केले : सरोज पाटील (माई)

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज ):**

भारतीय सामाजिक रचनेचे यथायोग्य आकलन करून घेण्यासाठी कॉ.शरद पाटील यांनी नवे प्रमाणशास्त्र विकसित केले. प्रमाणशास्त्र म्हणजे ज्ञान मिळविण्याच्या साधनांचे शास्त्र, असे प्रतिपादन महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष सरोज पाटील (माई) यांची आज येथे केले.

कै.श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि सत्यशोधक प्रबोधन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने प्राच्यविद्यापंडित कॉ.शरद पाटील यांचे स्त्रीदास्य व जातीदास्य विषयक चर्चाविश्व या विषयावर चर्चासत्राचे आयोजिन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये करण्यात आले होते. चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी सरोज पाटील (माई) बोलत होत्या.



सरोज पाटील (माई) पुढे बोलताना म्हणाल्या, प्राच्यविद्यापंडित आणि कृतीशील सामाजिक कार्यकर्ते म्हणून ख्याती असलेले कॉ.शरद पाटील कम्युनिस्ट चळवळीत सक्रीय होवून आदिवासी, शेतमजूर यांच्याकरिता विविध लढे उभारले. आजच्या काळात, विद्यार्थ्यांप्रती शिक्षक नेहमी संवेदनशील असले पाहिजे. प्रत्येक मूल गुणवत्तेचे आणि बुध्दीमत्तेचे लेणे घेवून जन्माला येत असते, हे शिक्षकांनी ओळखून पैलू पाडण्याचे काम केले पाहिजे. झोपडपट्टीमध्ये राहणारी मुले शिक्षणामुळे आज लघुउद्योजक आणि आमदार झालेली आहेत. आईच्या कडकपणामुळे आम्हाला चांगली शिस्त लागली. त्यामुळे पुढील आयुष्यामध्ये अनेक कठीण प्रसंगी आम्ही कोठेही सैरवैर झालो नाही. प्रत्येक भाऊ आपल्या क्षेत्रामध्ये कर्तबगार झाले आणि त्यांच्या शिस्तीमुळे, वागणुकीमुळे आज चार पद्मश्री घरात आहेत. शंभर वर्षांपूर्वी आईच्या कामांची लोकांनी निर्भत्सना केली. परंतु, वडीलांच्या भक्कम पाठींब्यामुळे आईची पुढील वाटचाल झाली.

सत्यशोधक प्रबोधन ट्रस्ट, पुणे येथील प्रा.प्रतिमा परदेशी मनोगतामध्ये म्हणाल्या, महाराष्ट्राच्या साहित्य व संस्कृतीच्या चळवळीमध्ये कॉ.शरद पाटील यांचे योगदान महत्वाचे आहे. त्यांनी इतिहास, संस्कृती, समाजकारण व अर्थशास्त्र या क्षेत्रात लेखन केले. विचार हे जेव्हा जनमानसामध्ये पकड घेतात तेव्हा समाजामध्ये जागृती निर्माण होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ.भारती पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.उर्मिला दशवंत यांनी केले तर आभार डॉ.नेहा वाडेकर यांनी मानले. कार्यक्रमास प्राचार्य टी.एस.पाटील, गौतमीपुत्र कांबळे, डॉ.निर्मला जाधव, सचिन गरूड, किशोर धमाले, डॉ.रणधीर शिंदे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थींनी मोठया संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 6 SEP 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit, Corner Appartment, Kolhapur.
Mob.: 9175089609

# सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या सर्वसमावेशक अर्थनीतीची भारताला गरज : डॉ. नरेंद्र जाधव

## शिवाजी विद्यापीठात डॉ. जे.एफ. पाटील स्मृती पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज ):**

महान अर्थसत्ता बनण्यासाठी सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणाऱ्या सर्वसमावेशक अर्थनीतीचा भारताने अवलंब करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन माजी राज्यसभा सदस्य तथा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज येथे केले.



शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या वतीने डॉ. जाधव यांना आज प्रा. (डॉ.) जे. एफ. पाटील स्मृती पुरस्कार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. ५१ हजार रुपये रोख, मानपत्र, शाल आणि ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरुप होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. नरेंद्र जाधव यांनी 'भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य: संधी व आव्हाने' या विषयावर अत्यंत तपशीलवार विवेचन केले. भारताच्या आर्थिक विकासाच्या जमेच्या बाजू अधोरेखित करीत असतानाच त्यावर परिणाम करणाऱ्या नकारात्मक बाजूंचा वेध त्यांनी घेतला आणि त्यावरील उपायांचेही मुद्देसूद सूचन केले. ते म्हणाले, भारत आज लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचा सर्वाधिक लाभार्थी आहे, अशी मांडणी सातत्याने केली जात आहे आणि ती खरीही आहे. कारण भारताचे सरासरी आयुर्मान आज २८ वर्षे इतके आहे, जे जगातील अन्य राष्ट्रांच्या तुलनेत कितीतरी तरुण आहे. तथापि, या लाभांशाचे मूल्य कोऱ्या धनादेशाप्रमाणे आहे. तो जर आपण वठविलाच नाही, तर त्याचा लाभ शून्य आहे. म्हणून लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचा लाभ उठवून आपण या मनुष्यबळाचा योग्य विनियोग केला पाहिजे. शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य या दोन क्षेत्रांवर सर्वाधिक लक्ष्य केंद्रित करून यामध्ये पुरेपूर गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. खाणारी तोंडे वाढत असताना काम करणारे हात त्या प्रमाणात न वाढल्यास सामाजिक अस्थैर्य निर्माण होऊन लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचे रुपांतर लोकसंख्याशास्त्रीय आपत्तीमध्ये होण्याचा धोका सर्वाधिक असतो, असा इशाराही यांनी दिला.

डॉ. जाधव पुढे म्हणाले, आपल्या देशात १० लाख लोकसंख्येचा 'ऑक्टोपस क्लास' आहे, ज्याने देशातील ८० टक्के संपत्तीवर कब्जा केला आहे. जातिनिहाय पाहू गेल्यास १२ टक्के उच्चवर्णीयांकडे ४१ टक्के संपत्ती, तर २७ टक्के मागासवर्गीयांकडे अवघी ११ टक्के संपत्ती असे विषम वाटप दिसते. भारतातील देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचीही सध्या अवस्था बिकट आहे. त्यांना मदतीची गरज आहे. भारतात थेट परकीय गुंतवणूक वाढताना दिसत असली, तरी देशातून बाहेर होणारी गुंतवणूक आणि परदेशातून देशात होणारी गुंतवणूक यांचे समीकरण पाहता देशात होणारी ही गुंतवणूक जवळपास शून्य आहे. या वस्तुस्थितीचा विचार करून धोरणकर्त्यांनी देशात सर्वसमावेशक अर्थनीती आणण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. विसाव्या शतकात अमेरिका, पश्चिम युरोप आणि जपान ही तीन आर्थिक वृद्धीची केंद्रे होती. आज एकविसाव्या शतकात मात्र अमेरिका हा ढासळता मनोरा असून चीन, रशिया आणि भारत ही नवी आर्थिक केंद्रे उदयास आली आहेत. भारताने यापुढील काळात अमेरिकेवर विसंबून राहून चालणार नाही, असेही डॉ. जाधव यांनी यावेळी सांगितले.

### 'परमस्नेह्याच्या नावचा पुरस्कार मिळाल्याचा आनंद मोठा'

डॉ. जे.एफ. पाटील हे माझे परमस्नेही होते. आम्हा मित्रमंडळींत ते 'ज.फा.' म्हणूनच लोकप्रिय होते. पूर्णपणे कोल्हापुरी व्यक्तीमत्त्वाचा आणि सर्वांना जीव लावणारा असा हा आमचा सन्मित्र होता. माझ्या आयुष्यातील ७५ वा पुरस्कार हा या माझ्या परमस्नेह्याच्या नावे मिळाल्याचा मला मोठा आनंद वाटतो आहे, अशी भावना यावेळी डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, शिक्षकाविषयी विद्यार्थ्यांनी कशी कॉतज्ञता व्यक्त करावी, याचा हा पुरस्कार म्हणजे वस्तुपाठ आहे. डॉ. जे.एफ. पाटील यांचे विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधकीय आणि प्रशासकीय वाटचालीमध्ये असण्याबरोबरच ते एक उत्तम माणूसही होते. सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यावरील अर्थशास्त्राचा प्रभाव दाखवून देण्याची आस त्यांना कायम राहिली. म्हणूनच अत्यंत सहजसोप्या भाषेत अर्थसंकल्पाचे विश्लेषण ते अखेरपर्यंत दरवर्षी करीत राहिले. भगवान महावीर अध्यासनाची इमारत हे त्यांचे स्वप्न होते. ते आता आम्ही पूर्ण करीत आहोत. डॉ. नरेंद्र जाधव म्हणजे प्रचंड इच्छाशक्ती, संधी शोधण्याची वृत्ती आणि त्यापायी कष्ट करण्याची प्रचंड तयारी याचे प्रतीक आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने त्यांचे 'आमचा बाप अन् आम्ही' हे आत्मचरित्र वाचलेच पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ. जे.एफ. पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिला. डॉ. राहुल म्होपरे यांनी मानपत्राचे वाचन केले. कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह माजी खासदार संजय मंडलिक, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. बी.पी. साबळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे डॉ. जे.ए. जाधव, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. वासंती रासम, डॉ. संजय ठिगळे, विविध अधिकार मंडळांचे सदस्य, डॉ. पाटील यांचे कुटुंबिय यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार

महा न्यूज & व्ह्यूज

1 6 SEP 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# विद्यापीठात शनिवारी फोटोग्राफीवर कार्यशाळा

**कोल्हापूर (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज ):**

शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन अधिविभागात शनिवार दि.१३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत फोटोग्राफी विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेमध्ये फोटोग्राफर सुधीर बोरनाक हे अद्यावत कॅमेरांबद्दल माहिती सांगून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कॅमेरा हाताळण्यास मिळणार आहे. कार्यशाळेसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. या कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ., कोल्हापूर

1 6 SEP 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# राज्यसेवा आणि संयुक्त पूर्वपरीक्षा विशेष मार्गदर्शन व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद




**कोल्हापूर (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज ):**

स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करायची असेल तर जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा, स्व:मूल्यांकन हे सगळे गुण अंगी असायला हवेत असे प्रतिपादन शाहूवाडीचे उपविभागीय पोलिस अधिकारी आप्पासो पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या, समाजशास्त्र अधिविभाग मार्फत दि. ११ सप्टेंबर, २०२५ रोजी राज्यसेवा आणि संयुक्त परीक्षांच्या पूर्वधर्तीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. श्री. पवार यांनी सदर मार्गदर्शनपर व्याख्यानात विद्यार्थ्यांना राज्यसेवा आणि संयुक्त पूर्वपरीक्षा संदर्भात बोलतांना अनेक बाबींवर प्रकाश टाकला. त्यात विषयनिहाय अभ्यास, अभ्यासाचे धोरण, संदर्भ पुस्तके, परीक्षेचे स्वरूप, अभ्यास दरम्यान पाळावयाच्या सवयी व शिस्त यासोबतच प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठीच्या सोप्या युक्त्या त्यांनी सांगितल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षेची तयारी करत असतांना स्वत:शी प्रामाणिक तर राहिलेच पाहिजे शिवाय आई-वडील आणि शिक्षकांसोबतही प्रामाणिक राहण्याचा सल्ला दिला. प्रयत्न केल्याशिवाय यश मिळत नाही, असेही ते म्हणाले.

समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रतिमा पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख डॉ. मयूरेश पाटील यांनी करून दिली. सुप्रिया वडर यांनी सूत्र संचालन तर आकाश ब्राम्हणे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. प्रल्हाद माने, यांच्यासह विद्यार्थी व संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

1 6 SEP 2025

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचे शनिवारी व्याख्यान

**कोल्हापूर (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज ):**

शिवाजी विद्यापीठातील मराठी, हिंदी आणि इंग्रजी विभाग यांच्या वतीने येत्या शनिवारी (दि. १३) दुपारी १२ वाजता सरस्वती सन्मान विजेते ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचे 'भारतीय समाजवास्तव : लेखक व लेखनदृष्टी' या विषयावर व्याख्यान आणि विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या गणित अधिविभागातील रामानुजन सभागृहा कार्यक्रम होईल, असे मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी कळविले आहे.



डॉ. शरणकुमार लिंबाळे हे मराठी साहित्यातील प्रख्यात लेखक, कवी, समीक्षक आहेत. त्यांचे 'अक्करमाशी' हे आत्मकथन मराठी साहित्यात मैलाचा दगड ठरलेले आहे. त्यांना 'सनातन' कादंबरीसाठी २०२० सालचा भारतीय साहित्यातील श्रेष्ठ असा सरस्वती सन्मान मिळाला. त्यांनी ४४ पुस्तके लिहीली आहेत. विशेष म्हणजे शिवाजी विद्यापीठाचे ते माजी विद्यार्थी आहेत.

डॉ. लिंबाळे यांनी भारतीय साहित्य क्षेत्राला दिलेल्या योगदानासाठी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. राजन गवस यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात येईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील असतील, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित असतील. तरी या कार्यक्रमासाठी साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
16 SEP 2025

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# बहुविद्याशाखीय ज्ञानार्जन ही आजघडीची शैक्षणिक गरजः कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के




**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज ):** आंतरविद्याशाखीय आणि बहुविद्याशाखीय ज्ञानार्जन ही आजघडीची शैक्षणिक व्यवस्थेची महत्त्वाची गरज आहे. त्या दृष्टीने शिक्षक आणि विद्यार्थ्यांसह शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच घटकांनी तयार असण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काल (दि. ९) केले.शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त) आणि सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरूंदवाड येथील अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''ब्रिजिंग ट्रॅडिशन अँड मॉडर्निटी: रिथिंकिंग नॉलेज इन ह्युमॅनिटीज अँड कॉमर्स'' या विषयावरील एकदिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परिषदेचे मार्गदर्शक व अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्यूकेशनचे अध्यक्ष विजय जयराम पाटील, प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोठावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये पारंपरिक व आधुनिक ज्ञान यांचा उत्तम संगम करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विज्ञान, वाणिज्य व मानव्य विज्ञान यांच्या ज्ञानाचा मेळ घालून बहुविद्याशाखीय पद्धतीने ज्ञानदान आणि संपादन हा याचा कालसुसंगत ढाचा आहे. भारतीय ज्ञान प्रणालीच्या माध्यमातूनही हे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न आहे. आजच्या शिक्षक, संशोधकांनी याचे भान सांभाळून नवी पिढी घडविण्यासाठी प्रतिबद्ध व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्र-कुलगुरू प्रमोद पाटील म्हणाले, नवीन तंत्रज्ञानाचा आधार घेऊन डिजीटल ह्युमॅनिटीच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, अर्थशास्त्र, कौशल्य, उद्योजकता यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणण्याच्या शक्यता आहेत. त्यांचा वेध तत्परतेने घेण्याचा हा कालखंड आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक डॉ. महादेव देशमुख म्हणाले, भारत हा जगामध्ये नॉलेज इकॉनॉमिक्सच्या माध्यमातून आणि वसुधैव कुटुम्बकम् या संकल्पनेतून खऱ्या अर्थाने विकसित होऊ शकतो. भारतीय अर्थव्यवस्था जगातील चौथ्या क्रमांकाची असून २०२७ पर्यंत पाच ट्रिलीयन डॉलर आणि २०३० पर्यंत सात ट्रिलीयन डॉलर इतकी होवून जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनण्याची क्षमता बाळगून आहे.

परिषदेत डॉ. प्रवीण सप्तर्षी (अमेरिका), डॉ. मदन मोहन गोयल, कुलगुरू, राजीव गांधी राष्ट्रीय युवा विकास संस्था (भारत सरकार), डॉ. अनुराग श्रीवास्तव (मलेशिया), डॉ. मुंथर मोहम्मद इब्राहिम (पॅलस्टाईन), डॉ. एफ. एम. नदाफ (गोवा), डॉ. विजयानंद सेल्वराज (अमेरिका) या मान्यवरांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. परिषेदेत एकूण ७५० शिक्षक, संशोधक यांनी सहभाग घेतला. एकूण २५० जणांनी शोधनिबंध पाठविले. त्यातील निवडक १८ संशोधकांना शोधनिबंध सादर करण्याची संधी देण्यात आली. परिषदेत अमेरिका, श्रीलंका, नेपाळ, मलेशिया, नायजेरिया इ. देशांतील संशोधक, तज्ज्ञांनी तर भारतातून राजस्थान, आसाम, पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश या विविध राज्यांतील २३० संशोधकांनी सहभाग घेतला. परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. दिग्विजय पाटील, डॉ. प्रमोद कांबळे, आर. डी. शिंगे यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

16 SEP 2025

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# 'निवृत्त शिक्षकाच्या शिष्यवृत्ती'चे शिवाजी विद्यापीठात वितरण

**कोल्हापूर (महा न्यूज अॅण्ड व्हूज ):**

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागात गेल्या मंगळवारी (दि. ९) 'निवृत्त शिक्षकाच्या शिष्यवृत्ती'चे पात्र विद्यार्थ्यांना प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

अधिविभागातर्फे 'निवृत्त शिक्षकाची शिष्यवृत्ती' आणि निवृत्त प्राध्यापक डॉ. सी.एच. भोसले यांच्या आईंच्या स्मृतीप्रित्यर्थ असणारे पारितोषिक तसेच 'विद्यावर्धिनी पारितोषिक' अशा शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येतात. यंदा अधिविभागातील विद्यार्थिनी लक्ष्मी कृष्णराज भिर्डे आणि कोमल शांताराम घुटुकडे यांना निवृत्त शिक्षकाची शिष्यवृत्ती, डॉ. भोसले यांच्या आईंचे स्मृती पारितोषिक सुबहान मिरासाहेब जमादार यांना आणि प्रियांका रामदास पाटील यांना विद्यावर्धिनी पारितोषिक प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी अधिविभागाच्या वतीने प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचाही त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक, संशोधकीय आणि प्रशासकीय योगदानाबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.



यावेळी अधिविभाग प्रमुख डॉ. राजीव व्हटकर, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. केशव राजपुरे यांनी मनोगते व्यक्त केली. डॉ. नीलेश तरवाळ यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला भौतिकशास्त्र अधिविभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. एम. आर. वाईकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

16 SEP 2025




# राज्यसेवा आणि संयुक्त पूर्वपरीक्षा विशेष मार्गदर्शन व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज ):**

स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करायची असेल तर जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा, स्व:मूल्यांकन हे सगळे गुण अंगी असायला हवेत असे प्रतिपादन शाहूवाडीचे उपविभागीय पोलिस अधिकारी आप्पासो पवार यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या, समाजशास्त्र अधिविभाग मार्फत दि. ११ सप्टेंबर, २०२५ रोजी राज्यसेवा आणि संयुक्त परीक्षांच्या पूर्वधर्तीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. श्री. पवार यांनी सदर मार्गदर्शनपर व्याख्यानात विद्यार्थ्यांना राज्यसेवा आणि संयुक्त पूर्वपरीक्षा संदर्भात बोलतांना अनेक बाबींवर प्रकाश टाकला. त्यात विषयनिहाय अभ्यास, अभ्यासाचे धोरण, संदर्भ पुस्तके, परीक्षेचे स्वरूप, अभ्यास दरम्यान पाळावयाच्या सवयी व शिस्त यासोबतच प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठीच्या सोप्या युक्त्या त्यांनी सांगितल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षेची तयारी करत असतांना स्वतःशी प्रामाणिक तर राहिलेच पाहिजे शिवाय आई-वडील आणि शिक्षकांसोबतही प्रामाणिक राहण्याचा सल्ला दिला. प्रयत्न केल्याशिवाय यश मिळत नाही, असेही ते म्हणाले.

समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रतिमा पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख डॉ. मयूरेश पाटील यांनी करून दिली. सुप्रिया वडर यांनी सूत्र संचालन तर आकाश ब्राम्हणे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. प्रल्हाद माने, यांच्यासह विद्यार्थी व संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# फोटोग्राफीच्या हँडस् ऑन ट्रेनिंगला प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे हँडस् ऑन ट्रेनिंग देण्यात आले. प्रसिद्ध ट्रेनर सुधीर बोरनाक यांनी उपस्थितांना प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणीचे धडे दिले.

मोबाईल तंत्रज्ञान विकसित झाले असले तरी कॅमेराचे महत्त्व बिलकुल कमी झालेले नाही. उलट कॅमेऱ्यामध्ये अनेक नवनवे प्रयोग होत असून फोटोची गुणवत्ता वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये गुंतवणूक होत आहे. फोटोग्राफीमध्ये उत्तम करिअर असले तरी त्यासाठी सातत्य आणि किमान काही कौशल्ये असणे आवश्यक आहे, असे मत बोरनाक यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : कार्यशाळेत फोटोग्राफीचे हँडस् ऑन ट्रेनिंग घेताना विद्यार्थी.**

**शिवाजी विद्यापीठातून**

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना कॅमेऱ्याची तपशीलवार माहिती देण्यात आली. कॅमेऱ्यातील तांत्रिक बाबी सोप्या शब्दात त्यांनी समजावून दिल्या. कॅमेरा हाताळत असताना कोणती दक्षता घ्यावी याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले. मास कम्युनिकेशन विभागासमोर तसेच विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतले. कॅमेरा हाताळताना येणाऱ्या अडचणींची सोडवणूकही करण्यात आली.

जयप्रकाश पाटील यांनी स्वागत केले. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. कार्यशाळेमध्ये कोल्हापूर, सांगली, सीमा भागातून अनेक जण सहभागी झाले होते.

16 SEP 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जतन : डॉ. चौगुले

## शिवराज महाविद्यालयात जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

पश्चिम महाराष्ट्रात कला व संस्कृतीचे जतन शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवाच्या माध्यमातून केले जात आहे. महाविद्यालयीन तरुणाईला कलेच्या अभिव्यक्तीची संधी देण्याचे कार्य विद्यापीठ नेहमीच करते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी केले.



गडग्लिज : युवा महोत्सवाचे उद्घाटन करताना डॉ. टी. एम. चौगुले, प्रा. किसन कुराडे. डॉ. अनिल कुराडे, प्राचार्य एस. एम. कदम आदी.

शिवाजी विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग व शिवराज महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ४५ व्या जिल्हा युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी 'शिवराज'चे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे होते.

प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी स्वागत केले. डॉ. चौगुले म्हणाले, जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन दरवर्षी पर्वणी असते. विद्यार्थ्यांनी कलागुणांना मिळणाऱ्या संधीतून आपल्या कलेचा अविष्कार घडवावा आणि त्यातून त्यांनी आनंद घ्यावा, यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून १४ कलाप्रकारांतून वैयक्तिक व सांघिक स्पर्धा होत असतात, असे सांगून अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या 'कमवा व शिका' योजनेमध्ये विद्यार्थीदशेत मोलाचे असे योगदान दिले असल्याचे गौरवोद्गार काढले.

यावेळी डॉ. अनिल कुराडे यांनी, शिवाजी विद्यापीठाचे 'शिवराज'ला युवा महोत्सवाचे यजमानपद मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी अर्णव बुवा यांनी राष्ट्रीय युवा महोत्सवात शास्त्रीय गायनामध्ये सुवर्णपदक पटकाविल्याबद्दल गौरविण्यात आला. युवा महोत्सवासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. एस. पाटील, डॉ. ए. एन. जाधव, डॉ. आर. डी. धमकले, ॲड. स्वागत परुळेकर, डॉ. एन. ए. कांबळे, डॉ. आर. एच. अतिग्रे, सुरेखा आडके, आर. पी. पाटील, 'शिवराज'चे उपाध्यक्ष के. जी. पाटील, ॲड. दिग्विजय कुराडे, एम. के. सुतार, प्रा. विश्वजित कुराडे, संचालक प्रा. बिनादेवी कुराडे, राजेंद्र मांडेकर, शंकर नंदनवाडे, बसवराज आजरी, प्रकाशराव तेलवेकर, पापा चौगुले, डॉ. संतोष शहापूरकर यांच्यासह विविध महाविद्यालयांचे शिक्षक, मान्यवर, कलाकार उपस्थित होते.

1 6 SEP 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेज अव्वल

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विद्यार्थी विकास विभाग व शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालयामार्फत जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सांघिक व वैयक्तिक स्पर्धा सर्वसाधारण विजेतेपद फिरता चषक विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने पटकावला.

युवा महोत्सवात लोकनृत्य कला प्रकारात दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट इचलकरंजी, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

लोककला- सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, शिवराज साहित्य वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज, डी. आर. माने आर्टस्, अँड कॉमर्स कॉलेज कागल.

एकांकिका- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज कागल, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

प्रहसिका- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय जयसिंगपूर, डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

मूकनाट्य- भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, आण्णासाहेब डांगे आर्टस् कॉमर्स हातकणंगले, दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इलकरंजी, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

पथनाट्य- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर, सदाशिवराव मंडलिक मुरगूड, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, विजयसिंह यादव कॉलेज पेठ वडगाव.




गडहिंग्लज : जिल्हास्तरीय युवा महोत्सवात कला सादर करताना विद्यार्थिनी.

भारतीय समूहगीत-विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कोल्हापूर, राजाराम कॉलेज कोल्हापूर.

वादविवाद- शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, के. आय. टी.चे कॉलेज ऑफ इंजि. कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, दि न्यु कॉलेज कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण हलकर्णी चंदगड.

प्रश्नमंजुषा- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय. पाटील कोल्हापूर, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेन्सनल व्होकेशनल कोर्स फॉर वूमन कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज.

एकपात्री अभिनय- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कॉलेज ऑफ नॉन-कनव्हेन्सनल व्होकेशनल कोर्स फॉर वूमन कोल्हापूर, आर्टस् कॉमर्स अॅन्ड सायन्स महाविद्यालय गडहिंग्लज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, दत्ताजीराव कदम इचलकरंजी.

सुगम गायन- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कोल्हापूर, भोगावती महाविद्यालय कुरुकली, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज हुपरी, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.

वक्तृत्व मराठी- डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज.

वक्तत्व हिंदी- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, जयवंत महाविद्यालय इचलकरंजी, दूधसागर महाविद्यालय बिद्री, डी. वाय. पाटील कॉलेज कोल्हापूर.

वक्तृत्व इंग्रजी- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिव-शाहू महाविद्यालय सरूड, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर, दि न्यू कॉलेज कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कोल्हापूर. विजेत्या प्रत्येक कला प्रकारातील पाच संघांची शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज मिरज येथे गुरुवार (दि. १८) होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी दिली आहे.

सकाळ

# विद्यापीठात विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे हँडस् ऑन ट्रेनिंग

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे एकदिवसीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे हँडस् ऑन ट्रेनिंग देण्यात आले. सुधीर बोरनाक यांनी उपस्थितांना प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणीचे धडे दिले.

'मोबाईल तंत्रज्ञान विकसित झाले असले तरी कॅमेऱ्याचे महत्त्व बिलकुल कमी झालेले नाही. उलट कॅमेऱ्यामध्ये अनेक नवनवे प्रयोग होत असून फोटोची गुणवत्ता वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये गुंतवणूक होत आहे. फोटोग्राफीमध्ये उत्तम करिअर असले तरी त्यासाठी सातत्य आणि किमान काही कौशल्ये असणे आवश्यक आहे', असे मत सुधीर बोरनाक यांनी व्यक्त केले.

या कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना कॅमेऱ्याची तपशीलवार माहिती देण्यात आली. कॅमेरा हाताळत असताना कोणती दक्षता घ्यावी, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले. मास कम्युनिकेशन विभागासमोर तसेच विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतले. जयप्रकाश पाटील यांनी स्वागत केले. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित फोटोग्राफी कार्यशाळेत हँड्स ऑन ट्रेनिंग घेताना विद्यार्थी.

सकाळ

# वस्तुसंग्रहालय शास्त्रसाठी ३० पर्यंत प्रवेश प्रक्रिया

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागातर्फे वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्षाचा असून प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता ही कोणत्याही शाखेतील पदवी आहे. संग्रहालय संचालक, अभिरक्षक, चित्ररक्षक सहायक, व्यवस्थापक, कलादालन व्यवस्थापक, अशा अनेक संधी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर संग्रहालय क्षेत्रात उत्तम करिअरच्या दृष्टिकोनातून उपलब्ध होऊ शकतात. ते लक्षात घेऊन वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका अभ्यासक्रम इतिहास अधिविभागातर्फे राबविण्यात येत आहे याचा विद्यार्थी-विद्यार्थिनी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, संशोधक यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील आणि अभ्यासक्रम समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
16 SEP 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ परीक्षा अर्ज भरण्यासाठीच्या सुधारित तारखा जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारित तारखा जाहीर झाल्या आहेत. महाविद्यालय व अधिविभागातील विद्यार्थ्यांना विनाविलंब शुल्कासह २२ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरता येणार आहे. यासंदर्भातील संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाविद्यालय व अधिविभागातील विद्यार्थ्यांना विनाविलंब शुल्कासह २२ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरता येणार आहे. विलंब शुल्कासह २३ सप्टेंबर ते २४ सप्टेंबरपर्यंत तर अतिविलंब

- विनाविलंब शुल्कासह २२ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरता येणार

शुल्कासह २५ सप्टेंबरपर्यंत परीक्षा अर्ज भरता येणार आहे. महाविद्यालय व अधिविभागांनी विनाविलंब शुल्कासह २३ सप्टेंबर, विलंब शुल्कासह २५ सप्टेंबर आणि अतिविलंब शुल्कासह २९ सप्टेंबरपर्यंत विद्यापीठाकडे परीक्षा शुल्क भरावयाचे आहे. तर महाविद्यालय व अधिविभागांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जाच्या याद्या शिवाजी विद्यापीठाकडे विनाविलंब शुल्कासह २५ सप्टेंबर तर विलंब व अतिविलंब शुल्कासह ३० सप्टेंबरपर्यंत सादर करावयाच्या आहेत. तरी याची महाविद्यालय, विद्यार्थ्यांनी दखल घ्यावी, असे आवाहन सहाय्यक कुलसचिव डॉ. के. ए. गुरव यांनी केले आहे.